## चौकशी अर्ज ८१/२०२२ निशाणी ६ खालील आदेश

**मानसी प्रमोद कामथे ....... अर्जदार.**

विरुध्द

**प्रमोद प्रकाश कामथे .........सामनेवाला.**

१. सदरील अर्ज सामनेवाला विरुध्द अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे. अर्जदाराचे कथन असे की अर्जदार क्र १ व सामनेवाला यांचा विवाह दिनांक ०२/०४/२०१५ रोजी ता. रोहा. जि.रायगड येथे घरच्यांच्या वडीलधा–यांच्या समक्ष झाला. सदर विवाह संबधातून अर्जदार हिस सामनेवालेपासून अर्जदार क्र २ रुही ही मुलगी झाली आहे. अर्जदाराचे कथन असे की लग्नानंतर काही दिवस सुखात गेल्यानंतर अर्जदारास तिला जेवण करता येत नाही या कारणावरुन मानसिक त्रास देणेस सुरुवात केली. अर्जदारास मुलगी झाल्यानंतरही सामनेवाला व त्यांची आई तिला पाहायला देखील आले नाही. तिच्या गरोदरपणात सामनेवाल्याने अर्जदाराची कोणतीही काळजी घेतली नाही. कधीही पोटभर जेवू दिले नाही. अर्जदारास तिच्या माहेरुन पैसे घेवून येण्यासाठी सामनेवाला तगादा लावत असे व नाही आणल्यास तिच्या मुलीला मारुन टाकण्याची धमकी देत असे. सामनेवालेने कधीही त्याला पतीधर्म पाळला नाही तो केवळ रात्री झोपण्यापुरता अर्जदाराच्या जवळ येत असे घरातील छोटया छोटया कारणावरुन अर्जदाराला सामनेवाला मारहाण करत असे तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेवून अर्जदाराचे परपुरुषांसोबत अनैतिक संबंध असल्याचे खोटे आरोपी लावत असे. अर्जदाराला तिच्या माहेरी कोणी आजारी असल्यास पाहण्यास जावू देत नसे. व अर्जदार माहेरी गेल्यास वेळेत घरी आली नाही तर संशंय घेवून मारत असे. सामनेवाल्याने अर्जदारास दिनांक १७/१२/२०१८ रोजी माहेरी हाकलून दिल्यापासून ती नाईलाजाने तिच्या आईवडीलांसोबत राहत आहे. अर्जदाराने

अनेक प्रयत्न करुन देखील सामनेवाला तिला नांदवण्यास तयार नाही. त्याने अर्जदार व तिच्या मुलीच्या पालनपोषणाची कोणतीही सोय केली नाही. म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. सामनेवालेने त्याच्या जबाबात अर्जदाराची सर्व कथने नाकारली असून केवळ त्यांचा विवाह व मुलीचा जन्म ही कथने मान्य केली आहेत. त्याने असे कथन केले आहे की लग्नानंतर काही दिवसांतच अर्जदार सामनेवालेकडे वेगळे राहण्याची मागणी करु लागली तिला सामनेवाल्याच्या आईवडीलांची अडचण वाटू लागली. ती सामनेवाला कामावरुन घरी आल्यावर छोटया छोटया गोष्टीवरुन सामनेवालेशी वाद घालू लागली. शेवटी सामनेवालेच्या आईवडीलांनी समजून घेवून सामनेवालेस स्वतत्र राहणेकरीता घराखालची रुम दिली. तेव्हा देखील अर्जदार सामनेवालेसोबत चांगली वागत नव्हती ती न सांगता ४ ते ५ दिवस माहेरी राहत असे. अर्जदाराला मुलगी झाल्यावर देखील सामनेवाले यास अतिशय आनंद झाला होता. व तिच्या गरोदरपणात सामनेवालेने अर्जदाराची योग्य ती काळजी घेतली परंतु रुही हिचा जन्म झाल्यावर अर्जदारास माहेर सोडून सासरी यायचे नव्हते. व सामनेवालेने अर्जदाराच्या माहेरी घर जावई बनवून राहावे अशी इच्छा होती. अर्जदाराने कोणतेही कारण घडलेले नसतांना सामनेवालेचा स्वतःहून त्याग केला आहे. सामनेवालेने अर्जदार नांदायला यावे या करीता अनेक प्रयत्न केले परंतु अर्जदार हिला कधीच संसारात गोडी नव्हती. असे कथन करुन सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली .

३. सामनेवाले व अर्जदार यांचा विवाह व त्यापासून झालेले अपत्य हि बाब अबाधित आहे. अर्जदार ही आजरोजी तिच्या माहेरी राहत आहे. तिचा व तिच्या मुलीचा खर्च तिचे आईवडील करीत आहेत हे प्रथमदर्शनी येथे दिसून

येते. म्हणजेच सामनेवालेने अर्जदार व तिच्या मुलीच्या पालनपोषणाची सोय केलेली नाही असेच प्रथमदर्शनी स्पष्ट होते. यावरुन अर्जदाराचा आर्थीक स्वरुपी कौटुंबिक हिंसाचार सामनेवालेने केल्याचे येथे प्रथमदर्शनी सिध्द होते. त्याचप्रमाणे अर्जदार हि आजही सामनेवालेची कायदेशीर पत्नी असल्याने सामनेवाला तिची जबाबदारी टाळू शकत नाही. माझे समोरील प्रकरणामध्ये अर्जदाराने जरी सामनेवालेच्या उत्पन्नाबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नसले तरीही सामनेवाला हा सुदुढ व धडधाकट असून उत्पन्न कमविण्याऐवढा सक्षम नक्कीच आहे असे म्हणण्यास हरकत नाही. त्यामुळे अर्जदाराने व सामनेवालेने दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करुन मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर .

२. सामनेवाला याने अर्जदार हिस तिच्यासाठी व तिच्या मुलीच्या पालनपोषण व शिक्षणाकरीता दरमहा रक्कम रुपये ४,०००/– अक्षरी चार हजार रुपये एवढी पोटगी हा अर्ज दाखल केल्यापासून मुळ अर्जाच्या अंतिम निकालापावेतो द्यावी.

कर्जत (पी.एस.आपटे )

दिनांक ०१/०७/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कर्जत